जा.क्र.मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/2539 /२०२४
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, मुंबई
दि. 11/10/24

**दक्षता विभागाचे परिपत्रक -१६**

विषय- मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ अंतर्गत कामांसाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर कामांच्या एकत्रिकरणाबाबत.

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ अंतर्गत कामे करणेसाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून कामनिहाय प्रशासकीय मान्यता प्रदान केली जाते. त्यामध्ये अ.क्र., कामाचे नाव तसेच कामाची अंदाजित किंमत नमूद केलेली असते.

काही प्रकरणांमध्ये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर मंडळाच्या स्तरावर योग्य कारणाशिवाय कामांचे एकत्रिकरण केले जाते. यामुळे कामाची किंमत वाढते व म्हाडाच्या निवीदा क्षमतेच्या (bidding capacity) निकषानुसार ते काम छोट्या एजन्सीजच्या निवीदा क्षमतेच्या पुढे जाते व ते स्पर्धेतून बाहेर पडतात, अशी तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर कामांचे एकत्रिकरणाबाबत शासनाची / म्हाडाची कोणतीही मार्गदर्शक तत्वे उपलब्ध नाहीत.

यास्तव सदर परिपत्रकान्वये असे सूचित करण्यात येते की, जिल्हाधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर जोपर्यंत शासनाकडून / म्हाडाकडून मार्गदर्शक तत्वे निर्गमित होत नाहीत तोपर्यंत कामाचे एकत्रिकरणाबाबत योग्य कारणमिमांसा नमूद करुन उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांची परवानगी घेण्यात यावी व नंतर एकत्रीकरण करावे

सदर परिपत्रकाचे काटेकोर पालन करण्यात यावे.

o/c

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,
मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

प्रत: उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांना माहितीसाठी.